बुधवार दि.१९ मार्च २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक बीड लोकनेता


मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत    संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१८४ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# राज्यातील एका विषारी मंत्र्याकडून दररोज समाजात द्वेष पसरवण्याचे काम–प्रकाश आंबेडकर

## नागपूर दंगल एका मोठ्या कटाचा भाग



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

बजरंग दल व विहिंपच्या आंदोलनानंतर नागपुरात झालेल्या दंगलीमुळे अवघ्या राज्याचे राजकारण तापले आहे. वंचित बहजुन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी या घटनेवरून राज्य सरकारलाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले आहे. त्यांनी राज्यातील एका विषारी मंत्र्याकडून दररोज समाजात द्वेष पसरवण्याचे काम सुरू असल्याचा आरोप करत नागपूरची दंगल एका मोठ्या कटाचा भाग असल्याचा दावा केला आहे.गत काही दिवसांपासून महाराष्ट्रात औरंगजेबाच्या कबरीवरून मोठे रणकंदन माजले आहे. मंत्री नीतेश राणे यांनी छत्रपती संभाजीनगरच्या खुलताबाद येथील औरंगजेबाची कबर हटवण्याचे भाष्य केल्यानंतर हिंदुत्त्वादी संघटनांनी या प्रकरणी आक्रमक भूमिका घेतली. त्यांनी सोमवारी या प्रकरणी राज्यात अनेक ठिकाणी आंदोलन केले. त्यानंतर नागपुरात रात्रीच्या वेळी मोठी दंगल उसळली. त्यात ३३ पोलिसांसह अनेकजण जखमी झालेत.वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी या घटनाक्रमावर तीव्र संताप व्यक्त केला आहे. तसेच या घटनेसाठी एकप्रकारे राज्य सरकारच जबाबदार असल्याचा आरोप केला आहे. महाराष्ट्र सरकारमधील एक विषारी मंत्री दररोज खुलेआमपणे साजात द्वेष पसरवण्याचा व दुही पिकवण्याचे काम करत आहे. एवढेच नाही तर महाराष्ट्रात दोन समाजात द्वेष पसरवण्यासाठी बाहेरून लोक आणले जात आहेत. हा एका मोठ्या सूनियोजित कटाचा भाग आहे, असे आंबेडकर मंत्री नीतेश राणे यांचे नाव न घेता म्हणाले. यावेळी त्यांनी नागपूरसह राज्यातील सर्वच जनतेला अफवांवर विश्वास न ठेवता शांतता राखण्याचेही आवाहन केले.

नागपूर शहरात सोमवारी सायंकाळी महाल परिसरातील चिटणीस पार्क व गांधी गेट परिसरात दोन गटांमध्ये तणाव निर्माण झाला होता. या प्रकरणी काही तरुणांमध्ये वाद झाला. त्यानंतर वेगवेगळ्या अफवा पसरत गेल्या. यामुळे मोठा जमाव परिसरात जमला. यावेळी घोषणाबाजीदेखील करण्यात आली. पोलिसांवरही दगडफेक करण्यात आली. त्यांना धक्काबुक्की करण्यात आली. त्यात दोन पोलिसांचे कपडे फाटले. काही समाजकंटकांनी रस्त्यांवरील वाहनांना आग लावली. या घटनेत काही तरुण जखमी झाले. त्यांना रुग्णालयात नेण्यात आले. परिस्थिती लक्षात घेता चिटणीस पार्क येथे अतिरिक्त कुमक मागवण्यात आली होती.जमावाने केलेल्या दगडफेकीत अनेक पोलिस कर्मचारी जखमी झाले आहेत. यावेळी आग विझविण्यासाठी दाखल झालेल्या अग्निशमन दलाच्या जवानांवरही जोरदार दगडफेक करण्यात आली. यावेळी आंदोलक दगड, चाकू फेकून मारत आहेत, अशी प्रतिक्रिया आग विझवायला गेलेल्या अग्निशामक दलाच्या जवानांनी दिली.


# महाराष्ट्रभूषण अशोक हांडेना गिरणा गौरवचा 'जीवनगौरव'

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नाशिक | प्रतिनिधी**

चौरंग या संस्थेच्या माध्यमातून लोककला आणि नाट्यकलेला प्रोत्साहन देणारे ज्येष्ठ रंगकर्मी अशोक हांडे यांना गिरणा गौरव प्रतिष्ठानचा यंदाचा मानाचा 'जीवन गौरव' पुरस्कार जाहीर झाला आहे.पुरस्कार वितरण सोहळा ५ एप्रिल रोजी नाशिकच्या महाकवी कालिदास कलामंदिरात सायंकाळी ५ वाजता होणार आहे. रक्कम रुपये एकवीस हजार, स्मृतिचिन्ह, मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. या पुरस्काराची घोषणा निवड समितीने काल केली.

उत्तर महाराष्ट्राचा मानाचा स्तंभ म्हणून सातासमुद्रापार ओळख निर्माण करणारी



खान्देशची जीवनवाहिनी असलेल्या गिरणा या नदीच्या नावाने गेल्या २५ वर्षांपासून महाराष्ट्रामधील विविध क्षेत्रात योगदान देणाऱ्या मान्यवरांना जीवन गौरव पुरस्काराने दर पाच वर्षांनी सन्मानीत करण्यात येते. २५ वर्षातला हा पाचवा जीवन गौरव पुरस्कार अशोक हांडे यांना प्रदान करण्याचा निर्णय समितीने घेतला. मराठी गायक, पटकथाकार, लेखक, दिग्दर्शक, नाटककार, लोककला आणि नाट्यकलेला त्यांनी प्रोत्साहन देण्याचे महत्त्वपूर्ण काम हांडे यांनी केले आहे. मराठीबाणा, आवाज की दुनीया, आझादी ५०, माणिकमोती, मंगलगाणी दंगलगाणी, गाणे सुहाने, मधुबाला आदी कार्यक्रम त्यांचे लोकप्रिय ठरले आहेत. म्हणूनच अशोक हांडे यांना जीवनगौरव प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती माजी आ.नानासाहेब बोरस्ते, ड.मिलिंद चिंधडे, प्रा.डॉ.लक्ष्मण महाडिक, डॉ.एस.के.पाटील, तुकाराम ढिकले, अशोक पाटील यांनी दिली.

# जवळगा येथे अवैध देशी दारू जप्त; एकावर गुन्हा दाखल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**निलंगा | इस्माईल महेबूब शेख**

देवणी तालुक्यातील जवळगा येथे अवैध देशी दारूवाहतूक प्रकरणी १५ मार्च रोजी देवणी पोलीसांनी कारवाई करत एकाला अटक केली आहे. या कारवाईत २ लाख ३० हजार २४० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, मौजे जवळगा येथून अवैध देशी दारूची वाहतूक होत असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. त्यानंतर पोलिसांनी तातडीने तपासणी केली असता, एका टाटा



सूमो वाहनातून (क्र. एमएच २४ सी ३१४२) मोठ्या प्रमाणावर देशी दारू आढळून आली.जप्त केलेल्या दारूमध्ये गोल्डन संत्रा व असली धार संत्रा कंपनीच्या कागदी टॅग असलेल्या १८० एमएलच्या काचेच्या सिलबंद बाटल्या होत्या. प्रत्येकी बॉक्समध्ये ४८ बाटल्यांसह एकूण ९ बॉक्स जप्त करण्यात आले. जप्त दारूची किंमत ३० हजार २४० रुपये असून, अवैध वाहतुकीसाठी वापरण्यात आलेल्या वाहनाची किंमत २ लाख रुपये आहे.या प्रकरणी पोलीस हेडकॉन्स्टेबल युसुफ शेख यांच्या फिर्यादीवरून आरोपी दिगंबर बालाजी बिरादार (रा. येणकी, ता. उदगीर) याच्या विरोधात गु.नं. ७९/२०२५ अंतर्गत कलम ६५ (ई) मकदा नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास कोडामंगले हे करीत आहेत.

# सामाजिक कार्यकर्ते रविंद्र काशिनाथ सोनार यांना केंद्रीय मानवाधिकार संगठनच्या महाराष्ट्र विशेष उपाध्यक्षपदी नियुक्ती व संविधान गौरव पुरस्कार!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बोदवड | ज्ञानेश्वर बुधवत**

दि.१५–०३–२०२५ रोजी केंद्रीय मानवाधिकार संगठन नई दिल्ली च्या वतीने गोळेगाव, ता. बोदवड, जि. जळगाव पू. खा. शेजारील श्री. गजानन महाराज संस्थान मंदीराच्या, सृष्टी सौंदर्याने नटलेल्या उद्यान परिसरामध्ये आयोजित प्रादेशिक अधिवेशन तथा पुरस्कार वितरण सोहळ्यामध्ये, सामाजिक सेवाभावी कार्यास्तव खानदेशात प्रसिद्ध असलेले मा. रविंद्र काशिनाथ सोनार, मौजे गोळेगाव यांच्या संवैधानिक सामाजिक योगदानाची दखल घेऊन, केंद्रीय मानवाधिकार संगठन नई



दिल्ली च्या महाराष्ट्र राज्य विशेष उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात येवून सोबतच त्यांना संविधान गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आल्याची घोषणा मा. राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. मिलिंद दहिवले यांनी करून त्यांचा संगठनच्या रा. अध्यक्ष, तसेच राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष तथा सामाजिक कार्यास्तव अमेरिकेतील विद्यापीठाकडून मानद डॉक्टरेट प्राप्त ज्येष्ठ साहित्यिक व कवी डॉ. विजयकुमार कस्तुरे, ड्व्होकेट, चिखली, राष्ट्रीय संघटन सचिव तथा साहित्यिक क्षेत्रातील वैशिष्ट्यपूर्ण आविष्कारासाठी अमेरिकन विद्यापीठातर्फे मानद डॉक्टरेट प्राप्त डॉ.बबनराव महामुने, छ. संभाजीनगर, उपाध्यक्ष मा. बशीर शेख, मुंबई, डॉ. अमरकुमार तायडे तथा नागसेन बुध्द विहार सचिव व सामाजिक कार्यकर्ते म्हणून साऊथवेस्टर्न अमेरिकन विद्यापीठाकडून मानद डॉक्टरेट प्राप्त डॉ. डी. व्ही. खरात सर, चिखली सह इतर मान्यवरांच्या हस्ते त्यांचा नियुक्ती व सन्मान पत्र तथा शाल आणि पुष्पगुच्छ प्रदान करून गौरव करण्यात आला. तसेच पुढील जनकल्याण यशवंत वाटचालीस्तव शुभेच्छा सुध्दा देण्यात आल्या. या त्यांच्या बहुमानामुळे सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# पत्रकार बाजीराव पाटील कळकेकर यांची लोकशाही पत्रकार संघाच्या मराठवाडा सचिवपदी निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**निलंगा | इस्माईल महेबुब शेख**

कळका ता.कंधार जि.नांदेड येथील दैनिक लोकनेता पेपर चे मराठवाडा विभागीय संपादक बाजीराव मारोतराव पाटील कळकेकर यांची लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष श्री भागवत वैद्य साहेब व लोकशाही पत्रकार संघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष श्री संदिप जाधव साहेब यांनी लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या मराठवाडा सचिव पदी दबंग पत्रकार गरीबांचे कैवारी दैनिक लोकनेता पेपर चे मराठवाडा विभागीय संपादक बाजीराव पाटील कळकेकर यांची निवड केली असून लोकशाही पत्रकार संघाच्या वाढीसाठी कार्य करण्यासाठी अध्यक्ष, उपाध्यक्ष, पदाधिकारी, पत्रकार यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.तसेच लोकशाही पत्रकार संघाचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष श्री प्रभाकर पांडे सर, लोकशाही पत्रकार संघाचे लातूर जिल्हा उपाध्यक्ष व दैनिक लोकनेता पेपर चे मराठवाडा विभागीय उपसंपादक इस्माईल महेबुब शेख निलंगेकर यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.त्यांचे सर्वत्र कौतुक होत असून शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.



# लोकप्रशासन विभागाची सेतु सुविधा केंद्रास अभ्यास भेट

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली | गौतम गावंडे**

बिलोली तालुक्यातील शंकरनगर येथील श्री मधुकरराव बापूराव पाटील खतगावकर महाविद्यालयातील लोकप्रशासन विभागाच्या द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांची आज दिनांक १८ मार्च २०२५ रोजी सेतु सुविधा केंद्रास अभ्यास भेट देण्यात आली. कौशल्य विकास अभ्यासक्रमांतर्गत ई प्रशासनाचा अभ्यास करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ शिवाजीराव पाटोदे यांच्या मार्गदर्शनाखाली सेतु सुविधा केंद्रास भेट देण्यात आली. या भेटीदरम्यान महा–ई–सेवा केंद्राचे संचालक श्रीमान लतीफ पठाण यांनी विद्यार्थ्यांना महा–ई–सेवा / सेतू सुविधा केंद्राकडून दिल्या जाणाऱ्या




सेवा सुविधांची विस्तृतपणे माहिती दिली. विद्यार्थ्यांना आवश्यक असणाऱ्या रहिवासी प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर, राष्ट्रीयता प्रमाणपत्र, स्पर्धा परीक्षेचे आवेदन पत्र, शिष्यवृत्तीचे आवेदन पत्र भरण्याची प्रक्रिया व इतर विविध सुविधांची माहिती दिली. त्याचबरोबर आधार कार्ड, पॅन कार्ड, पिक विमा, फार्मर आयडीचे रजिस्ट्रेशन, आयुष्मान भारत योजनेची माहिती विद्यार्थ्यांना करून दिली. याप्रसंगी लोकप्रशासन विभागाचे प्रमुख डॉ. शंकर लेखने यांनी प्रास्ताविक करताना या अभ्यास भेटीचा उद्देश स्पष्ट केला. त्याचबरोबर लोकप्रशासन विभागातील प्रा. ज्ञानेश्वर कोकणे यांनी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांचे व महा–ई–सेवा केंद्राचे संचालक श्री लतीफ पठाण व सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे आभार मानले. याप्रसंगी बी.ए. द्वितीय वर्षाचे उध्दव गावंडे, सहदेव सूर्यवंशी, बनेश बटलवाड, शांतेश्वर भुसेवाड, ओंकार शेटेवाड यासह अनेक विद्यार्थी उपस्थित होते.

# उमरी येथे शिवजयंती निमित्त रक्तदान शिबिर राबविण्यात आली

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी | महेश पडोळे**

शिवसेनेच्या वतीने तालुका प्रमुख तथा माजी नगराध्यक्ष सुभाष पेरेवार यांच्या मार्गदर्शनाखाली तिथी नुसार शिवाजी राजे जयंती विविध सामाजिक उपक्रमांनी साजरी करण्यात आली. दि.१७ मार्च रोजी सोमवारी सकाळी ८=०० वाजता लाडकी बहीण रांगोळी स्पर्धा,९=३० वाजता हनुमान मंदिर गल्ली मैदानावर महीलांच्या हस्ते ध्वजारोहण नंतर १०=३० वाजता मोंढा मैदानावरील मध्यवर्ती छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पूतळ्यास अभिवादन आणी शिवध्वजाचे ध्वजारोहण सेवा निवृत्त सैनिक विजय कदम गोळेगावकर यांच्या हस्ते करून राजविर



पांडुरंग कोलेवाड आणी सफिया शेख या बालकांच्या शिवजन्मोत्सव विषयी वक्तृत्वाला शिवप्रेमींची दाद मिळाली. दुपारी ११=३० ला रक्तदान शिबिराचे उद्धघाटन झाले याही वेळी दर वर्षी प्रमाणे हिंदू, मुस्लिम,सिख, बौद्ध आशा मावळ्यांनी रक्तदानाची सुरूवात केली. सायंकाळी ५=३० वाजता समाज प्रबोधनात्मक विषय घेऊन सर्व समावेशक अशी शोभा यात्रा चे आयोजन करण्यात आले आहे. पारितोषिक वितरणाचा कार्यक्रमा नंतर शिवजन्मोत्सव सोहळ्याची सांगता होईल. या वेळी उद्योगपती मारोतराव कवळे गूरूजी, राष्ट्रवादी चे डॉ.विक्रम देशमुख, पांडुरंग देशमुख गोरठेकर, रेल्वे प्रवासी संघटनेचे रेल्वे बोर्ड सदस्य पारसमल दर्डा, छावा चे राजेश जाधव,प्रकाश पाटील चिंचाळकर, मारोतराव मोरे, लक्ष्मण सापते,बालाजी महाराज चिंचाळकर, गणेश पगलवाड यांच्यासह बहुसंख्य शिव प्रेमी उपस्थित होते.

## संमेलनाध्यक्ष भारत सातपुते यांची मागणी

# मराठी भाषेला समृद्ध करण्यासाठी जगभरातील मराठी साहित्य चळवळीला महाराष्ट्र शासनाने आर्थिक पाठबळ द्यावे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पुणे । प्रतिनिधि**

ग्रामीण भागातील लेखकांच्या लेखणीमुळे साहित्याच्या परंपरागत त्याच त्या चौकटीमध्ये बदल होऊन कष्टकरी उपेक्षित वर्गांचे दुःख मराठी साहित्यात आली असून आता संपूर्ण देशासह जगभरात मराठी भाषा समृद्ध करण्यासाठी जे जे उपक्रम चालू आहेत त्या त्या साहित्य चळवळीला महाराष्ट्र शासनाने आर्थिक पाठबळ देऊन मराठी भाषेचा प्रचार व प्रसार करण्यासाठी प्रेरणादायी योजना आखाव्यात अशी रोखठोक भूमिका ज्येष्ठ साहित्यिक भारत सातपुते यांनी कर्नाटकातील छत्रपती शिवराय मराठी साहित्य संस्कृती मंडळाच्या दुसऱ्या साहित्य संमेलनाचे संमेलनाध्यक्ष म्हणून आपली भूमिका मांडली. पुढे बोलताना श्री सातपुते म्हणाले की लेखकांनी आपल्या लेखनीशी प्रामाणिक राहून सतत परिवर्तनाच्या पहाटेसाठी अस्वस्थ होऊन साहित्य परिषदा व साहित्य संमेलनातून जातीला , धर्माला व भ्रष्ट पंगाटरामाना थारा न देता माणुसकीच्या साहित्याला सामर्थ्यवान बनवावे असे विचार व्यक्त केले. या संमेलनाचे उद्घाटक म्हणून बिदर जिल्हा पंचायतचे माजी उपाध्यक्ष डॉ. प्रकाश पाटील यांनी मराठी भाषेचा गौरवस्पद इतिहास सांगून कर्नाटकात मराठी साहित्य संमेलने होतात याचा सार्थ अभिमान वाटतो असे म्हणाले. यावेळी प्रमुख वक्ते , उदगीर येथील वाचकसंवाद चळवळीचे संयोजक श्री अनंत कदम यांनी बिदर जिल्ह्यातील मराठी साहित्य चळवळी बाबत घडामोडी विषद केल्या




. या साहित्य संमेलनात गंभीरानंद सोमवंशी यांचे उंबरठा, भीमराव गणेश यांचे ज्ञानेश्वर माऊली प्रसाद मालिका, अ.के.आकरे यांचे चोरी व तानाजी सावरे यांच्या डोंगरघाट या चार पुस्तकाचा प्रकाशन समारंभही संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी येथील प्राचार्य व्यंकटराव जाधव यांनी साहित्यिकांच्या साहित्याला आपण आर्थिक व सामाजिक बळ देऊ अशी भूमिका मांडली. या संमेलनात प्रमुख पाहुणे म्हणून डी.जी. जगताप म्हणाले की कर्नाटक मराठी साहित्य अकादमीला शासनाने मान्यता द्यावी. यावेळी डॉ. जयभारत भालके, अभिमन्यू निरगुडे, सूर्यकांत ससाने, तुकाराम मोरे आदी मान्यवर उपस्थित होते. या एकदिवसीय साहित्य संमेलनाच्या शेवटच्या सत्रात संमेलनाध्यक्ष भारत सातपुते यांच्या अध्यक्षतेखाली कवीसंमेलन घेण्यात आले. या कवीसंमेलनास दत्तात्रय पवार ,अनिता गाडे, रोहिदास कांबळे, आनंद जाधव, मल्हारी कांबळे, केशव बिरादार, सदानंद ममदे, संतोष मुळे ,तुकाराम मोरे, अंजली मुळे, तानाजी सावरे आदी चाळीस कवींनी काव्यवाचन केले . कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष डॉ. सुब्बाराव पाटील यांनी सर्वांचे स्वागत केले ,तर भानुदास पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक ,लेखक अ.के. आकरे , अंजली मुळे यांनी या संमेलनाचे सूत्रसंचालन ,तर आभार तुकाराम शेडोळे यांनी मानले. कार्यक्रमास या परिसरातील रसिक विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे श्रीगोंदा तालुका हिंदुहृदयसम्राट प्रतिष्ठान यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता सकाळी प्रतिमापूजन पोलीस निरीक्षक किरण शिंदे माजी आमदार बबनराव पाचपुते साहेब नगरसेवक योगीराज गाडे शुभांगी ताई पोटे बापू तात्या गोरे यांच्या शुभहस्ते संपन्न झाली संध्याकाळी मिरवणूक खर्च टाळून छावा चित्रपट दाखविण्यात आला यावेळी उपस्थित हिंदुहृदयसम्राट प्रतिष्ठान अध्यक्ष



बाळासाहेब दुतारे सुरेश देशमुख संभाजी घोडके दीपक घोडके शिवाजी समदडे सागर खेडकर राहुल गायकवाड रघुनाथ सूर्यवंशी संतोष चिकलठाणे हरिभाऊ काळे गणेश लाटे सोमनाथ धोत्रे सुदाम सावंत सुशांत भंडारी देविदास तोरडे शिवाजी समदडे संध्याकाळी शिवप्रतिमेचे पूजन करून छावा चित्रपट सुरू करण्यात आला यावेळी उपस्थित प्रतिभाताई पाचपुते मंजुळाताई देशमुख अनुराधाताई दुतारे ज्योतीताई खेडकर सुनिताताई शिंदे मनीषाताई घोडके सागर खेडकर राहुल गायकवाड कुलदीप क्षिरसागर सुशांत काळे चंदन घोडके अमर घोडके विशाल चव्हाण अमीन भाई शेख सुदाम झुंजुरुक अशोक खेंडके मोठ्या संख्येने शिवसैनिक शिवभक्त उपस्थित होते यावेळी छावा चित्रपट पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणामध्ये गर्दी झाली होती शिवसैनिक युवा सैनिक शिवजयंती उत्सव समितीचे सर्व पदाधिकारी हिंदुरुदय सम्राट प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खानवडी गावच्या आदर्श माता श्रीमती.लक्ष्मीबाई धिवार यांचे निधन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आळंदी देवाची । इम्रान हकीम**

महात्मा ज्योतिबा फुले यांचे जन्मगाव असणाऱ्या खानवडी ( ता. पुरंदर ) जिल्हा पुणे या गावातील आदर्श माता,आदर्श गृहिणी श्रीमती लक्ष्मीबाई शंकर धिवार वय (९०) यांचे शनिवार दि. १५ मार्च २०२५ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांच्या पाठीमागे तीन मुले, सुना,चार मुली,जावई नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. सेवानिवृत्त पोलीस अधिकारी उत्तम अण्णा धिवार व नीरा कृषी उत्पन्न बाजार समितीचे मा.संचालक व बहुजन हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष सुनिलतात्या शंकर धिवार यांच्या त्या मातोश्री होत.लक्ष्मीबाई धिवार यांच्या पार्थिव देहावर खानवडी येथील स्मशानभूमीत पवित्र कऱ्हानदीकाठी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले .या प्रसंगी पुणे जिल्हा परिषदेचे मा. सदस्य सुदामराव इंगळे ,राष्ट्रवादी कॉंग्रेस ( शरदचंद्र पवार



गटाचे ) पुरंदर तालुका अध्यक्ष ,.माणिकराव झेंडे– पाटील,पुणे जिल्हा नियोजन समितीचे मा. सदस्य रमेश इंगळे , आर. पी.आय.(आठवले गट) पुरंदर तालुका अध्यक्ष बळीराम सोनवणे , सामाजीक, धार्मीक, शैक्षणीक ,राजकीय,कृषी, सहकार, कला, क्रीडा, व्यापार,पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवर,खानवडी ग्रामस्थ, सर्व आजी,माजी सरपंच ,उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य धिवार परिवाराचे नातेवाईक ,मित्रपरिवार, बहुजन हक्क परिषदेचे महाराष्ट्र राज्यातील पदाधिकारी,कार्यकर्ते हजारोच्या संख्येने उपस्थित होते.

# संपादक ज्ञानेश्वर बुधवतांना केंद्रीय मानवाधिकार संगठन नई दिल्लीच्या वतीने संविधान गौरव पुरस्कार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**जळगाव । प्रतिनिधी**

दि. १५–०३–२०२५ रोजी मौजे गोळेगाव, तथा. बोदवड, जिल्हा जळगाव पू. खा. शेजारील श्री.गजानन महाराज मंदिर परिसरातील उद्यानात आयोजित केंद्रीय मानवाधिकार संगठन, नई दिल्ली च्या प्रादेशिक अधिवेशन – २०२५ तथा पुरस्कार वितरण सोहळ्यामध्ये, अल्पकालावधीत आपल्या छंद व लेखणीतून महाराष्ट्रच नव्हे तर इतर राज्यातही आपला पेपर जनसामान्य माणसांपर्यंत नेऊन पोहचवून अन्यायाला वाच्या फोडणारे दैनिक लोकनेता चे संपादक ज्ञानेश्वर बुधवत मातृतीर्थ सिंदखेड राजा जि. बुलढाणा यांना बहुमानाच्या

संविधान गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. संगठनचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. डॉ. मिलींद दहीवले, नई दिल्ली यांच्यासह राष्ट्रीय कार्याध्यक्ष तथा सामाजिक सेवाभावी कार्यास्तव अमेरिकेतील विद्यापीठाकडून मानद डॉक्टरेट प्राप्त डॉ.ड.



विजयकुमार कस्तुरे, चिखली, राष्ट्रीय संगठन सचिव तथा साहित्यिक प्रभावी कथाकथनास्तव अमेरिकन विद्यापीठातर्फे मानद डॉक्टरेट पदवीने सन्मानित डॉ. बबनराव महामुने, छ. संभाजीनगर, उपाध्यक्ष जनाब बशीर शेख, मुंबई, महाराष्ट्र राज्य पदाधिकारी डॉ. पंकज इंगळे, जळगाव, डॉ. अमर कुमार तायडे, नवनिर्वाचित वरिष्ठ उपाध्यक्ष मा. रविंद्र काशिनाथ सोनार, गोळेगाव आणि डॉ. डी.व्ही. खरात इ. मान्यवरांच्या हस्ते सदर पुरस्कार सन्मानपत्र, शाल व पुष्पगुच्छ प्रदान करून ज्ञानेश्वर बुधवत यांचा गौरव करण्यात आला. सर्व स्तरांमधून त्याचे हार्दिक अभिनंदन होत असून पुढील यशवंत वाटचालीसाठी त्याच्यावर शुभेच्छांचा सुध्दा वर्षाव होत आहे.

# लोणी प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांची हेळसांड – प्रशासन कधी लक्ष देणार?




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आर्णी । अनिकेत खारोळ**

तालुक्यातील लोणी प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी असले, तरी ते नियमित उपस्थित नसल्याने रुग्णांची प्रचंड गैरसोय होत आहे. सोमवारी (दि. १७ मार्च रोजी) येथे ओपीडी उपकेंद्रातील डॉक्टरांकडून चालवली जात असल्याचे समोर आले. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात असून, जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली जात आहे. वैद्यकीय अधिकारी हजरच नाहीत!लोणी प्राथमिक आरोग्य केंद्रात दोन वैद्यकीय अधिकारी कार्यरत असले, तरी प्रत्यक्षात ते मुख्यालयात राहत नाहीत. बहुतांश वेळा ते गैरहजर असतात, तर हजर असले तरी ओपीडी सकाळी ९ ऐवजी उशिराने सुरू होते. सोमवारी परिस्थिती अधिकच गंभीर होती. रुग्णांनी डॉक्टरसाठी तासनतास वाट पाहिली, पण ओपीडी उपकेंद्रातील डॉक्टर घेत होते . यामुळे रुग्णांना योग्य उपचार मिळत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला.

सरकारी पगार, पण जबाबदारी झटकली?

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, हे डॉक्टर अधिकाऱ्यांच्या शिस्तीचे कुठलेही नियमन नाही. त्यांचा वारंवार अनुपस्थित राहण्याचा प्रकार सुरुच असून, याबाबत वरिष्ठांकडे वारंवार तक्रारी केल्या जात आहेत. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. सरकारी पगार घेऊनही आपली जबाबदारी झटकणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई होत नसल्याने ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत.

### रुग्णांच्या जीवाशी खेळ सुरू!

**वैद्यकीय अधिकारी अनुपस्थित असल्याने गंभीर रुग्णांवर उपचारांची जबाबदारी कम्युनिटी हेल्थ ऑफिसर (उकज्ञ) सांभाळत आहेत. मात्र, सीएचओचे काम सहाय्यक स्वरूपाचे असून, ते वैद्यकीय अधिकाऱ्यांऐवजी उपचार करण्यास सक्षम नाहीत. त्यामुळे गंभीर रुग्णांना वेळेत उपचार मिळत नाहीत. ग्रामस्थांनी याला रुग्णांच्या जीवाशी खेळ असे संबोधत आरोग्य अधिकाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.**

**मी काही दिवसांपूर्वी लोणी प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट दिली होती. त्या वेळी डॉक्टर गैरहजर होते. यासंदर्भात वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळवले आहे. पुढील कारवाई लवकरच केली जाईल.**
**– डॉ. आरती नाटकर, तालुका वैद्यकीय अधिकारी**

### प्रशासन झोपेत? उच्चस्तरीय चौकशीची मागणी

**ग्रामस्थांनी वारंवार तक्रारी करूनही आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकारी डोळेझाक करत आहेत का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. तालुका प्रशासनाने तातडीने लक्ष घालून जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.**

# शेतकऱ्यांनी साधला कुलगुरू व शास्त्रज्ञा सोबत संवाद

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । गोविंद मोरे**

भारतीय अनुसंधान संस्था पुसा भारत सरकार नवी दिल्ली येथे वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी आदरणीय कुलगुरू डॉक्टर इंद्रमनी सर यांच्या मार्गदर्शनाखाली व सेंद्रिय शेतीचे समन्वयक डॉक्टर आनंद गोरे सर यांच्या नियोजना खाली महाराष्ट्रातील ०९ शेतकऱ्यांनी दिली भेट त्यावेळी एटिक येथे शेतकरी व बीज उत्पादनामध्ये नवनवीन बियाणे विकसित करणारे शास्त्रज्ञ डॉक्टर एन वी कुंभारे सर यांच्यासोबत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी दोन ते अडीच तास मीटिंग हॉलमध्ये संवाद साधला त्यावेळी अनेक नवनवीन मोहरी गहू आंबा लिंबू मोसंबी गोभी भाजीपाला सर्व बियाणे विषयी सविस्तर संवाद साधला व नवनवीन विकसित केलेल्या बियाण्यांच्या लागवडी खालील प्लॉटला भेटी दिल्या व उन्हाळी हंगामामध्ये येणारे भाजीपाल्याची बियाणे ही शेतकऱ्यांना लागवडीसाठी भेट दिले त्यावेळी डॉक्टर कुंभारे सर यांनी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना खूप समजून तेथील वातावरणावर तेथील बियाण्यावर सखोल मार्गदर्शन केले काही बियाणे थंड प्रदेशात उत्पादन देणारे आहेत त्यामुळे महाराष्ट्र हा दमट वातावरणाचा भाग आहे म्हणून दिल्ली उत्तर प्रदेश मध्ये प्रदेश या भागातील काही वरायटी महाराष्ट्रामध्ये प्रतिसाद देत नाहीत असेही सरांनी सांगितले त्यावेळी शेतकऱ्यांसाठी उभारण्यात आलेल्या एटीक मार्केट शेतकऱ्यांच्या स्वतः पिकवणे आणि स्वतः विकणे बाजारपेठेला भेट दिली आणि तेथील शेतकऱ्यांशी चार तासाच्या जवळ जवळ संवाद साधला अनेक गोष्टी आम्हाला कळाल्या आपल्याही महाराष्ट्र मध्ये असे प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी कायमस्वरूपी बाजारपेठ उपलब्ध करून दिली



तर नक्कीच शेतकरी पिकवतील आणि खपवतील हे आम्हाला कळाले आणि दिल्लीतील राहणारे कर्मचारी नागरिक मोठ्या प्रमाणामध्ये शेतकऱ्यांचा माल खरेदी करण्यासाठी त्या मार्केटमध्ये येत होते आणि शेतकऱ्याच्या एमआरपीप्रमाणे घेऊन जात होते व आमचे मार्गदर्शक आदरणीय डॉक्टर कुलगुरू इंद्र मनी सर यांचं स्वप्न आहे मराठवाड्यामध्ये आशा प्रत्येक जिल्ह्यामध्ये बाजारपेठा तयार करण्याचे आणि आमचे कुलगुरू मार्गदर्शक इंद्र मनी सर भारतातील सर्व कुलगुरू पैकी सर्वात कार्यसम्राट म्हणून ओळखले जातात केंद्र सरकारचा आणि आमच्या सरांचा खूप जवळीक संबंध आहे त्यामुळे आम्हाला आशा आहे की लवकरच मराठवाड्यामध्ये विकेल ते पिकेल बाजारपेठ तयार होईल आणि आमच्या कुलगुरू साहेबांचं स्वप्न पूर्ण झालं म्हणजे आमचेही स्वप्न पूर्ण होईल व कुलगुरू साहेबांनी परिषदेमध्ये असंही सांगितलं की परिषद ही परिषद राहिली नाही पाहिजे त्याचं रूपांतर शेतकरी शास्त्रज्ञ संवादामध्ये झालं पाहिजे म्हणून सरांनी आम्हाला ५० ते ६० उत्तर प्रदेश येथील शेतकऱ्यांशी व आंतरराष्ट्रीय १८ देशातील शास्त्रज्ञांची भारतातील १०० च्या वर शास्त्रज्ञा सोबत संवाद साधण्याची संधी उपलब्ध करून दिली आम्ही कधीही उत्तर प्रदेश येथे गेलो तर त्या भागातील शेतकरी आम्हाला संवाद साधण्यासाठी आणि तेथील नवनवीन प्रयोग याबद्दल माहिती देण्यासाठी सज्ज आहेत म्हणजे आमची खूप अशी मैत्री झाली वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील टीमने आमचा दहा दिवसाचा आंतरराष्ट्रीय परिषदेचा दौरा खूप मेहनत घेऊन यशस्वी केला त्याबद्दल आमच्या सर्व शेतकऱ्यांकडून सर्व टीमचे अभिनंदन व आभार. अनुभव लेखन महाराष्ट्र शासन युवा शेतकरी रत्नाकर पाटील.

# देगलूर तालुका महामार्गला जोडा नितीन गडकरीकडे मागणी–भाजपा जिल्हा उपाध्यक्ष संतोष पाटील


लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । जयपाल दावनगीरकर**

नांदेड जिल्ह्यातील देगलूर तालुका हा कर्नाटक, तेलंगणा राज्याच्या तिन सिमेवर आहे देगलूर तालुका हा मागासलेला तालुका असून या तालुक्याचा अद्यापही विकास झालेला नाही या दोन्ही राज्यातील रस्ते पाहीले तर चकचकीत दिसून येतील देगलूर तालुक्यातील रस्ते पाहीले असता तर रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ते अशी परिस्थिती आहे म्हणून आला महाराष्ट्र असे पर राज्यातील शिख व प्रवाशी नागरीक बांधवानी प्रवास करताना नाचक्की करत असल्याने शहाण्या माणसाला शर्मेनी मान झुकावे लागत आहे पण येथील आमदार खासदारांना काही फरक पडत नाही देगलूर तालुका आजही चांगल्या रस्त्यांअभावी हा परिसर विकासापासून कोसो दूर आहे. देगलूर तालुका प्राचीन मंदिरासाठी प्रसिध्द आहे.

देगलूर तालुक्यातील होट्टल,रामपूर, येरगी तसेच करडखेड येथे चालुक्य काळातील ऐतिहासिक वारसा असलेली मंदिरे पर्यटन क्षेत्रे आहेत. त्यामुळे देश–विदेशातून लोक येथे येत असतात. मात्र येथे जाण्यासाठी चांगले रस्ते नसल्याने पर्यटकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. देशातील सर्व पर्यटन स्थळे राष्ट्रीय महामार्गशी जोडले जात आहेत.त्या धर्तीवर राष्ट्रीय महामार्ग क्र.६३ हा रामपूर, होट्टल, येरगी, (तेलंगणातील) हे एक चंडेगाव, माळेगाव, बिदर मार्गे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५० शी जोडावा नांदेड ते बीदर रस्ता सुद्धा कमी अंतराचा होतो. तसेच देगलूर ते हनेगाव रस्ता सुद्धा राष्ट्रीय महामार्गशी जोडावा ज्यामुळे शीख भाविकांना सुद्धा बीदर जाण्यासाठी सोयीचे व कमी अंतराचे होईल .

नांदेडहून येणारे शीख भाविक दररोज बिदर येथील गुरुनानक गुरुद्वारात जातात.परंतु हा रस्ता खूपच खराब झाल्याने शीख भाविकांना तसेच या मार्गावरून जाणाऱ्या शेकडो विद्यार्थी व नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. हा मार्ग चांगला झाल्यास विविध प्रांतातून येणाऱ्या शीख व इतर भाविकांना रामपूर,होट्टल,येरगी व करडखेड येथील चालुक्य कालीन मंदिरांना भेट देता येईल त्यामुळे या क्षेत्रातील पर्यटन वाढण्यास मदत होईल तसेच आपली ऐतिहासिक सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी वाव मिळेल.हे चार ही मंदिरांचे पर्यटन सर्किट झाल्याने एक महत्वाचे पर्यटन सर्किट म्हणून प्रसिद्धीस येईल. केंद्रीय मंत्री नितीन गडकरींना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, हा राष्ट्रीय मार्ग जोडून देगलूरच्या जनतेला खराब रस्त्यापासून दिलासा द्यावा. भाजपा जिल्हा उपाध्यक्ष तथा येरगी चे सरपंच संतोष पाटील यांनी दिनांक १० मार्च रोजी दिल्ली येथे सदरील निवेदन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना त्यांच्या निवासस्थानी भेटून दिले आहे. याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याची आग्रही भूमिका घेऊन सविस्तर चर्चा करून यावेळी संतोष पाटील यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना येरगी येथील चालुक्य कालीन सांस्कृतिक वारसा दर्शवणारा कॉफी टेबल बुक देऊन सत्कार करण्यात आला.



# नांदेड जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांच्या हस्ते विश्वनाथ गोविंदराव पाटील होळगे पुरस्काराने सन्मानित

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । गोविंद मोरे**




कृषी व पौष्टिक तृणधान्य महोत्सव २०२५ महाराष्ट्र शासन कृषी विभाग व रोटरी क्लब नांदेड यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित जिल्हा कृषी महोत्सव उन्नत शेती समृद्ध शेतकरी शेतकरी उत्पादिते ग्राहक विक्री संकल्पनेवर आधारित आयोजन. नांदेड जिल्हाधिकारी श्री मा. राहुल कर्डिले साहेब व नांदेड पोलीस अधीक्षक श्री. अबिनाश कुमार यांच्या हस्ते माननीय श्री विश्वनाथ होळगे यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.त्यांनी गेल्या अनेक वर्षात आर्या नैसर्गिक शेतीच्या माध्यमातून विषमुक्त अन्न प्रचार व प्रसाराची धुरा सांभाळत आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा महाराष्ट्र तथा देश पातळीवर पोहोचवला.या अनुषंगाने त्यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.याप्रसंगी जिल्हा कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत साहेब,उपविभागीय कृषी अधिकारी विठ्ठल गीते साहेब,कृषी उपसंचालक नागरगोजे साहेब, निवृत्त कृषी संचालक सुरेश अंबुलगे साहेब, मंडळ कृषी अधिकारी तिडके साहेब, घुमनवाड साहेब, स्मार्ट प्रकल्प अधिकारी शिरफुले साहेब आत्मा विभाग सोहेल साहेब अनेक अधिकारी कर्मचारी वर्ग पंचक्रोशीतील शेतकरी उपस्थित होते. विश्वनाथ गोविंदराव पाटील होळगे रा. दापशेड ता.लोहा जि. नांदेड मो. नं. ९७ ६४ ०२५२०९.

# सेनगांव शहरातील अपंग कैलास गवळी यांना तिनचाकी सायकलचे वाटप

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**



शहरातील कैलास सुदामा गवळी यांचा काही वर्षापुर्वी अपघात झाला होता त्या अपघातात त्यांचा एक पाय निकामी झाल्याने त्यांचे चालणे–फिरणे बंद झाले होते.परंतु पत्रकारांच्या पुढाकाराने व गटविकास अधिकारी माधव कोकाटे यांच्या सहकार्याने दि.१८ मार्च मंगळवार रोजी अपंग कैलास गवळी यांना सायकलचे वाटप करण्यात आले.

सेनगांव शहरातील अंत्यत गरीब असलेल्या कैलास गवळी यांचा काही वर्षापुर्वी अपघात झाला होता व त्यामध्ये दुर्दव्याने त्यांचा एक पाय निकामी झाल्याने त्यांचे चालणे,फिरणे बंद झाल्याने घरातच एका ठिकाणी बसण्याची वेळ आली होती.पत्रकार महादेव हरण व पत्रकार विश्वनाथ देशमुख यांनी पुढाकार घेत सेनगांवचे गटविकास अधिकारी माधव कोकाटे यांची भेट घेत अंत्यत गरीब असलेल्या गवळी यांना तिन चाकी सायकलची गरज असल्याची माहिती दिली.गटविकास अधिकारी माधव कोकाटे यांनी लगेच सहकार्य करीत त्या अपंगाला सायकल दिली.नगरसेवक अमोल तिडके,भाजपा युवा शहराध्यक्ष गजानन उफाड यांच्या हस्ते कैलास गवळी यांना तिन चाकी सायकल देण्यात आली.यावेळी पत्रकार महादेव हरण,विश्वनाथ देशमुख,गजानन उगीरे आदी उपस्थित होते.

# अनेक समर्थकांना सोबत घेऊन राष्ट्रवादी कॉँग्रेसमध्ये प्रवेश करणार–भास्करराव खतगांवकर



लोकनेता न्यूज नेटवर्क

**मालेगाव । संदीप कदम**

नांदेड जिल्ह्यातील अनेक बड्या नेत्यांना मागील काळात वेळप्रसंगी पक्ष बदलावे लागले होते आणि मी देखील मागील अनेक वर्षे कॉँग्रेसमध्ये आमदार – खासदार णून काम केलो त्यानंतर भाजपात काही दिवस गेलो परत कॉँग्रेसमध्ये आलो आणि आता मी आपल्या भागाचं हित जोपासण्यासाठी माझ्या अनेक समर्थकांसह राष्ट्रवादी कॉँग्रेस (अजित पवार ) गटांमध्ये २३ मार्चला प्रवेश करणार आहे अशी माहिती ज्येष्ठ नेते माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांनी नरसी येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत दिली .

या पत्रकार परिषदेला माजी खासदार तथा कंधार लोहा मतदार संघाचे राष्ट्रवादी कॉँग्रेसचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर , जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी , माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा , अविनाश घाटे , प्रवीण चिखलीकर , भास्कर भिलवंडे , वसंत सुगावे , अशोक पाटील मुगावकर, बिलोलीचे तालुका अध्यक्ष रंजीत पाटील हिवराळे आदींची प्रमुख उपस्थिती होती .

पुढे बोलताना भास्करराव खतगावकर म्हणाले की आपल्या भागातील अनेक विकासात्मक कामे हे अद्यापही प्रलंबित आहेत त्यामुळे शासकीय सत्तेत असणारा पक्ष राष्ट्रवादी कॉँग्रेस आहे राष्ट्रीय नेते उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे विकासात्मक नेतृत्व आहे त्यांच्यावर विश्वास ठेवून मी येणाऱ्या २३ मार्च रोजी नरसी येथे राष्ट्रीय नेते अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत होणाऱ्या मेळाव्यात ३०० पेक्षा अधिक आजी माजी सरपंचासह इतर पक्षातील काही पदाधिकाऱ्यांसह मी आणि डॉ. मिनलताई खतगावकर पक्षप्रवेश करणार आहोत अशी माहिती दिली . त्याचबरोबर उद्या दिनांक २३ मार्च रोजी नरसी येथे होणाऱ्या राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या या पक्षप्रवेश मेळाव्यासाठी आपल्या भागातील किमान १५ ते २० हजार कार्यकर्ते उपस्थित राहतील अशी अपेक्षा व्यक्त केली .

# महागाव शहरामध्ये मंगेश वानखेडे सरांचे आधुनिक महिला अभ्यासिका केंद्राचे उद्घाटन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**महागाव । विजय थोरात**



महागाव येथे श्री महिला अभ्यासिका केंद्राचे उद्घाटन अयोध्या धाम येथील महंत शिवराम दासजी त्यागी यांच्या हस्ते संपन्न झाले. युवती महिलांना स्पर्धा परीक्षेची तयारी करता यावी यासाठी महागाव येथील श्री कॅम्पुटर चे संचालक मंगेश वानखेडे यांच्या संकल्पनेतून आधुनिक तंत्रज्ञानाने सुजल अशी महिला अभ्यासिका केंद्राची निर्मिती करण्यात आली असून या अभ्यासिकेचे उद्घाटन अयोध्या येथील महंत शिवराज दासजी त्यागी महाराज राघवेंद्रजी त्यागी महाराज महंत जगदीश महाराज लोन दरेश्वर यांच्या हस्ते संपन्न झाले.याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून तहसीलदार अभय मस्के गट विकास अधिकारी ज्ञानेश्वर टाकरस संजय निंबेकर (शेत्रधिकारी भारतीय स्टेट बँक शाखा महागाव )१ विदर्भ जन आंदोलन आधार संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष जगदीश जी नरवाडे सुदाम खंदारे विजय सूर्यवंशी संजय कोपरकर माजी नगराध्यक्ष सुरेश पाटील नरवाडे प्रतीक नरवाडे सुमित घोटे गजू पाटील नरवाडी यांच्यासह अभ्यासिकेचे संचालक मंगेश वानखडे दादाराव वानखेडे उपस्थित होते.याप्रसंगी महंत त्यागी महाराज यांनी अभ्यासिकेचे महत्त्व सांगून पुरातन काळात गुरुकुलम मध्ये राहून एकांतात शिक्षण घेतल्या जात होते. त्यामुळे इतिहासात अनेक कृत्वन ऋषीमुनी तसेच अनेक महापुरुष लाभले आहेत. या अभ्यासिकेचा लाभ तालुक्यातील गरजूवंत विद्यार्थ्यांना नक्कीच होईल याच अभ्यासकेतून भविष्यात कलेक्टर, एस पी, डी वाय एस पी, डेप्युटी कलेक्टर, तहसीलदार, डॉक्टर घडतील या संकल्पनेतून मंगेश भाऊ वानखेडे यांनी अभ्यासिकेची निर्मिती केली. महागाव शहरामध्ये मंगेश भाऊ वानखेडे. अनेक प्रकारे जनजागृती करण्याचे अनमोल काम करीतच असतात. सायबर क्राईम गुन्ह्याबद्दल गावोगावी जाऊन विद्यार्थ्यांना जागृत करणे. म्हणूनच आज संपूर्ण महागाव तालुक्यातून त्यांच्यावर विद्यार्थ्यांचा कौतुकांचा वर्ष होत आहे.याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून तहसीलदार अभय मस्के गट विकास अधिकारी ज्ञानेश्वर टाकरस संजय निंबेकर (शेत्रधिकारी भारतीय स्टेट बँक शाखा महागाव )१ विदर्भ जन आंदोलन आधार संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष जगदीश जी नरवाडे सुदाम खंदारे विजय सूर्यवंशी संजय कोपरकर माजी नगराध्यक्ष सुरेश पाटील नरवाडे प्रतीक नरवाडे सुमित घोटे गजू पाटील नरवाडी यांच्यासह अभ्यासिकेचे संचालक मंगेश वानखडे दादाराव वानखेडे उपस्थित होते.याप्रसंगी महंत त्यागी महाराज यांनी अभ्यासिकेचे महत्त्व सांगून पुरातन काळात गुरुकुलम मध्ये राहून एकांतात शिक्षण घेतल्या जात होते. त्यामुळे इतिहासात अनेक कृत्वन ऋषीमुनी तसेच अनेक महापुरुष लाभले आहेत. या अभ्यासिकेचा लाभ तालुक्यातील गरजूवंत विद्यार्थ्यांना नक्कीच होईल याच अभ्यासकेतून भविष्यात कलेक्टर, एस पी, डी वाय एस पी, डेप्युटी कलेक्टर, तहसीलदार, डॉक्टर घडतील या संकल्पनेतून मंगेश भाऊ वानखेडे यांनी अभ्यासिकेची निर्मिती केली. महागाव शहरामध्ये मंगेश भाऊ वानखेडे. अनेक प्रकारे जनजागृती करण्याचे अनमोल काम करीतच असतात. सायबर क्राईम गुन्ह्याबद्दल गावोगावी जाऊन विद्यार्थ्यांना जागृत करणे. म्हणूनच आज संपूर्ण महागाव तालुक्यातून त्यांच्यावर विद्यार्थ्यांचा कौतुकांचा वर्ष होत आहे.

# कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या मागण्यांची पूर्तता करा!

## कंधार तहसीलदारांमार्फत शालेय शिक्षण मंत्र्यांना दिले निवेदन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या समस्या सोडवल्या जात नसल्याने व वारंवार आश्वासन देऊनही आश्वासित मागण्यावर निर्णयांची अंमलबजावणी होत, नसल्याने राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक नाराज असून यांच्या विरोधात दि. १७ मार्च रोजी राज्यभर कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांनी आंदोलन करून रोष प्रकट केला. याच अनुषंगाने कंधार मध्येही सोमवारी आंदोलन करून कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या मागण्यांची पूर्तता करा,अशी मागणी शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या संदर्भात तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात असे म्हंटले आहे की, आपण पदभार स्वीकारल्या पासून कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या समस्या सोडवण्यासाठी एकदाही स्वतंत्र बैठक घेतली नाही व समस्यांचे निराकरणही केले नाही.कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या समस्यांबाबत शासनाने चर्चा करून गेल्या वर्षी काही मागण्या मान्य करीत लोखी आश्वासन दिल्यानंतर महासंघाने बारावीच्या उत्तरपत्रिका तपासणीवरील बहिष्कार मागे वेतला होता.त्यानंतर मान्य मागण्यांमधील १२९८ वाढीव पदांना मान्यता देण्याऐवजी सदर पदांवर कार्यरत केवळ २८३ शिक्षकांच्या समयोजनेचा आदेश दि. ९ नोव्हेंबर २३ रोजी व ७ मार्च २४ रोजी काढला व राज्यात काही शिक्षकांचे समायोजन करण्यात आले. परंतु अनेक शिक्षकांचे समायोजन अजून झालेले नाही, काही प्रस्ताव अद्याप प्रलंबित आहेत.




आय टी शिक्षकांच्या समायोजनाचा शासनादेश, अंशतः अनुपान प्राप्त शिक्षकांना वाढीव राजा, सेवांतर्गत आश्र्वासित प्रगती योजना,शाळा संहितेनुसार विद्यार्थी संख्येचे निकष पाळणे इत्यादी मान्य मागण्यांचे आदेश निघाले नाहीत. याबाबत अनेक वेळा निवेदने देऊनही अद्याप आपण चर्चा केली नाही.त्यामुळे सर्व शिक्षकांच्या मनात असंतोष निर्माण झाला आहे. नोव्हेंबर २००५ पूर्वी अर्थवेळ, विनाअनुदानित तसेच अंशातः अनुदानावरील नियुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, सेवा निवृत्त धारकांना या योजनेचा तातडीने लाभ द्यावा, नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, राज्यातील अंशतः अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना प्रचलित धोरणानुसार टप्पा वाढ देण्यात यावी, जाहीर केलेले अनुदान त्वरित देण्यात यावे,मान्यता प्राप्त आय.टी. शिक्षकांच्या समायोजना बाबतचा शासनादेश त्वरित निर्गमित करण्यात यावा,आदी मागण्या निवेदनात समाविष्ट करण्यात आल्या आहेत. महासंघाच्या सूचनेप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या विविध प्रलंबित मागण्यांचे निवेदन नायब तहसीलदार रेखा चामणवार यांना १७ मार्च रोजी देण्यात आले. यावेळी ता. उपाध्यक्ष प्रा.सुभाष वाघमारे, प्रा. शेट्टीवाड एस.पी., प्रा.माधव ब्याळे,प्रा.हनमंत वाडकर, प्रा.विनोद हिप्पळगावे, प्रा. राम आडकीने, प्रा. विठ्ठल जामगे आदी उपस्थित होते.

# देगलूर येथील दर्गाह हजरत जियाओद्दीनची शंभर हेक्टर जमीन वक्फ बोर्डाच्या ताब्यात

## शेकडो अतिक्रमण धारकांना नोटीसा खळबळ





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

देगलूर | जयपाल दावनगीरकर

देगलूर येथील हजरत जियाओद्दीन रिफाई दर्गाह, आशुरखाना व कब्रस्तानांची नोंद महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात असताना वक्फ बोर्डाच्या शंभर हेक्टर जमीन मालमत्तेवर गेल्या दहा वर्षापासून दर्गाह च्या जागेवर अनेक लोकांनी किंवा भूमाफियांनी अनाधिकृत रित्या वाटेल त्या मार्गाचा अवलंब करून या जमिनीचा विल्हेवाट कशा प्रकारे लावता येईल तशा प्रकारे अवैधरित्या खरेदी-विक्री करून अतिक्रमण केलेल्या दोषीवर फौजदारी गुन्हे दाखल होण्याची शक्यता आहे. नांदेड जिल्हा वक्फ अधिकारी श्री. मिहताशीम असकारी यांनी वेगळीच कारवाई केली त्यांचाअहवाल वक्फ बोर्डाकडे पाठवण्यात आला वक्फ बोर्डाने त्यांचा अहवाल वगळून वक्फ बोर्डानेच निर्णय घेऊन ताब्यात घेतला आहे.छत्रपती संभाजीनगर चे अधिक्षक श्री.मोहम्मद मुदसीर यांच्या समजूतीने व त्यांचे सहाय्यक श्री. एहतेशाम, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. मा. मुशीर अहेमद शेख, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. मा.जुनेद सय्यद, (राज्यमंत्री दर्जा प्राप्त) चेअरमन श्री.काजी समीर यांनी आदेश जारी करून गंभीर दखल घेतली त्यांच्याविरुद्ध अधिनियम १९९५ कलम ५२ व ५२ अ आणि ५४ प्रमाणे कारवाई करून दिनांक २७ फेब्रुवारी २०२५ रोजी मरवमं यांचा नोंद क्र.४४/३८७/२०२५ करून दर्गाह हजरत जियाओद्दीन रिफाई कब्रस्तान व आशुरखाना महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाने वक्फ बोर्डाचे मुतवली यांच्याशी व वक्फ बोर्डाशी काहीही संबंध नसल्याचे स्पष्ट केले आहे.

सद्या वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६५ प्रमाणे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून वक्फ बोर्डाच्या नावे दर्गाह हजरत जियाओद्दीन साहेब यांच्या नावे दिनांक २३ जानेवारी १९७५ साली भाग - बि च्या अनु. क्र.०१ वर १३८६९.४० चौरस मीटर मध्ये दर्गा, कब्रस्तान व आशुरखाना त्यांच्या सेवेसाठी असलेली इनामी जमीन सर्वे नंबर ५५, ५७, ५९, ६०, ८१, ८२, १२२, १२३ व १३४ मध्ये एकुण क्षेत्र ९६ हेक्टर ३० आर जमीन सदरील कलमा प्रमाणे महाराष्ट्र राज्य वक्फ मालमत्तेवर छत्रपती संभाजीनगर यांच्या व्यवस्थापनाखाली ताब्यात घेण्यात आले आहे.दर्ग्याच्या बहुतांश जमिनीवर अतिक्रमण या अवैध खरेदी-विक्रीचे बनावट कागदपत्र निदर्शनास आले याबाबत काही सामाजिक कार्यकर्त्यांनी तक्रार केली असता त्यावेळी व बोर्डाकडून नोटीसाही पाठविण्यात आल्या होत्या मात्र याकडे संबंधितांनी दुर्लक्ष केल्यामुळे याप्रकरणाची शासनाकडून सखोल चौकशी करून यातील दोषींवर गुन्हे दाखल करण्यासाठी दर्गाह चे सर्वस्वी व्यवस्थापनाने स्वतः निर्णय घेतल्याने अतिक्रमण धारकांत प्रचंड खळबळजनक दिसून येत आहे.

# जिवती तालुक्याचा घसा कायम कोरडा पाण्याचा प्रश्न ऐरणीवर



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

जिवती | प्रतिनिधी

मिणी मराठवाड्याचा पाणी प्रश्न गंभीर असून आगामी तो आणखी बिकट होणार आहे, उन्हाळ्यात हे जलसंकट मिणीमराठवाड्याची अवस्था दरवेळी बिकट करत असते. जिवती तालुक्याला हक्काचे पाणी मिळण्यासाठी. शासनाने २०१४ मध्ये दोन लघुसिंचन तलाव मंजुर केले होते आणी पहाडावरील नागरिक पाण्याचे स्वप्न पाहु लागले मात्र तालुक्यातील संपूर्ण जमीनच वनविभागाची असल्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला त्यामुळे ते काम थांबले मात्र या विषयाचे गांभीर्य नसल्याचे चित्र दिसुन आले लोकप्रतिनिधी निवांत आहेत हे चित्र अस्वस्थ करणारे आहे. पाणीपुरवठा करणारा एकही सक्षम प्रकल्प नाही २०१३ पासुन मंजुर असलेले दोन लघुसिंचन प्रकल्प कागदावर आहे. जल जिवन मिशन अंतर्गत जिवती तालुक्यातील सर्वच गावात जेमतेम दोन वर्षांपासुंन धिम्या गतीने कामे सुरू आहेत मात्र अद्याप पाणी अजुनही हंड्यात पडलें नाहीं.एकीकडे वाढत्या शहरांची तहानही वाढत असून भविष्यात ती आणखी तीव्र होणार आहे. ठोस उपाययोजना राबविण्याच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांचा अमृत निधी पदरात पाडून घेण्यासाठी चढाओढ लागते पण निधीच्या या अमृताचे रुपांतर अजुनही पाणीपुरवठ्यात झालेले नाही. त्यामुळे शहरी भागाला भविष्यात तर ग्रामीण भागाला उन्हाळ्यात भेडसावणार्या टंचाईची झळ बसु लागली आहे.पाणी भरताना आदिवासी महीलेचा झालेल्या मृत्यूची घटना येथील भीषणता दाखवते.अनेक वर्ष निघून गेली असली तरी परीस्थिती मात्र जैसे थे आहे.

### राजकीय धावपळ

**लोकसभेपासून ते ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये पाण्याचा मुद्दा हा कळीचा ठरतो त्यामुळे निवडणुका येतात राजकीय पक्षांना पाणी आठवते आणि आश्वासनाची धावपळ सुरू होते, हा आतापर्यंतचा अनुभव आहे, आता लोकसभा, विधानसभा, निवडणुका आटोपल्या आहेत, यावेळी जीवती तालुक्यातील पाण्याचा प्रश्नही वेळ हुशारीने टाळण्यात राजकीय पक्षांना यश आले. पण आता स्वराज्यसंस्था निवडणुका डोळ्यासमोर आहेत अशावेळी स्थानिक पातळीवर पाणी समस्या येणार हे गृहीत धरण्यात आले आहे. त्यामुळे मतदारांना खुश करण्यासाठी सध्या वाढीव पाण्याचे स्वप्न दाखवण्यात येत असल्याचा आरोपही होत आहे.**

**“ जिवती तालुक्याला पाणीपुरवठा करणारा एकही सक्षम प्रकल्प नाही वाढत्या तालुक्याला पिण्याच्या पाण्याची मागणी ही वाढत आहे. येत्या काही वर्षात पाण्याची मागणी सध्यापेक्षा दुप्पट होण्याची शक्यता तज्ञांनी वर्तवली आहे. दरवेळीच्या निवडणुकीतील आश्वासना पलीकडे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्याकडे कोणत्याही राजकीय पक्षांनी गांभीर्याने पाहिलेले नाही वेळीच उपयोजना न केल्यास पाणीबाणी वाढण्याची शक्यता आहे -निशिकांत सोनकांबळे संचालक कृ.षी उत्पन्न बाजार समिती कोरपणा**

# लोकमान्य टिळक विद्यालय टाकळी येथील दहावी बोर्ड परिक्षा कॉफी मुक्त वातावरणात सुरळीत



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

देगलूर | जयपाल दावनगीरकर

देगलूर तालुक्यातील मरखेल येथील लोकमान्य टिळक विद्यालयात विद्यार्थ्यांचे दहावी एसएससी २०२५ ची बोर्ड परीक्षा सुरळीत वातावरणात पार पडली आहे. मरखेल केंद्र क्रमांक ५१०५ लोकमान्य टिळक विद्यालय मरखेल, जिल्हा परिषद हायस्कूल मरखेल, श्री मदनेश्वर विद्यालय लोणी, पोष्ट बेसिक आश्रम शाळा शिळवणी, श्री संत गाडगेबाबा विद्यालय माळेगांव (मक्ता), टाकळी (ज.) परिक्षेसाठी (२४७) एकूण विध्यार्थी होते यापैकी (२४४) विध्यार्थी उपस्थित व (०३) गैरहजर होते. त्यामुळे मरखेल लोकमान्य टिळक विद्यालय परिक्षा केंद्रामध्ये काफी मुक्त वातावरणात सुरळीतपणे दहावीची परीक्षा पार पडली असून केंद्र संचालक श्री गवाले सर हे होते व लोकमान्य टिळक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. मोरे सर व सर्व पर्यवेक्षक यांनी सतर्क राहून एसएससी परीक्षा २०२५ ची कॉपीमुक्त अभियानात झाली. जिल्हाधिकारी यांच्या आदेशान्वये व सर्व बैठे पथक अधिकारी यांच्या सहकार्याने तसेच भरारी पथकातील अधिकारी व बैठे पथक प्रमुख श्री. रवी जाधव सर, डीपीसीओ मुक्कावार, गटशिक्षणाधिकारी श्री. तोटावार, भरारी पथकातील अधिकारी श्री. शिंदे अभियंता व पोलीस प्रशासन मरखेल पो.स्टेचे पोलीस निरीक्षक श्री. रवी हुंडेकर व त्यांचे सहकारी यांनी चोक कडेकोट बंदोबस्त बजावल्याबद्दल सर्वांचे केंद्र संचालक श्री. गवाले सर व मुख्याध्यापक श्री. मोरे सर आदी उपस्थित होते. पोलीस कडेकोट बंदोबस्त असल्याने या परीक्षा केंद्रामध्ये कुठलाही अनुसूचित प्रकार न घडता सुरक्षित लोकमान्य टिळक विद्यालय परीक्षा केंद्रात एसएससी परीक्षा २०२५ ची पार पडली आहे. याबद्दल केंद्र संचालक श्री मुहारी गवाले सर यांनी सर्व परिक्षा भरारी पथके अधिकारी, कर्मचारी यांचे अखेर परीक्षा संपन्न झाल्यानंतर सर्वांचे आभार मानले आहेत.

# तळीखेळ पार्टी येथे अपघात एक ठार तर तीन गंभीर

## हायवेचा खड्डा चुकवताना झाला अपघात

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

निलंगा | इस्माईल महेबूब शेख



निलंगा तालुक्यातील तळीखेड पाटी जवळ भरधाव वेगाने येणाऱ्या चारचाकी कार वाहनाने एका मोटारसायकलला जोराची धडक दिल्याने मोटारसायकलवरील दोन सख्ख्या भावांतील एकामोठ्या भावाचा जागीच मृत्यू झाला तर लहान भाऊ गंभीर जखमी झाल्याची घटना सोमवारी ता. १७ मार्च रोजी घडली आहे.दत्ता सुरेश कदम (वय-३५ वर्ष) रा. सावरी, ता. निलंगा असे अपघातात मृत्यू झालेल्याचे नाव असून लहान भाऊ दिगंबर सुरेश कदम असे जखमी झालेल्या लहान भावाचे नाव आहे. हा अपघात लातूर जहीराबाद महामार्गावर दुपारी रस्त्यावरील पडलेला मोठा खड्डा चुकवण्यात घडला. यामध्ये तिघे गंभीर जखमी झाले आहेत.

याबाबत मिळालेली अधिक माहिती अशी की, निलंगा तालुक्यातील सावरी येथील दत्ता सुरेश कदम व दिगंबर सुरेश कदम हे दोन सख्खे भाऊ असून हे दोन्ही भाऊ हैद्राबाद येथे नौकरी करत होते, सावरी गावात पंढरपूरची पालखी येते त्यामुळे गावात जेवणाचे कार्यक्रम ठेवण्यात आला होता. त्यामुळे ते कांही दिवसांपूर्वी आपल्या मुळ गावी म्हणजे सावरी येथे आले होते. कार्यक्रम झाला. त्यानंतर दोन्ही भाऊ है एलआयसीचा हप्ता भरून घ्यावा व नंतर आपल्या कामाला हैद्राबादला जावं यासाठी ते हप्ता भरण्यासाठी निलंग्याला येत होते. मात्र निलंगा मार्गे औरादला जाणारी भरधाव वेगाने सियाज नावाच्या कारने लातूर जाहीराबाद महामार्गवरील तळीरखेड पाटीला खड्डा चुकवण्याच्या नादात मोटारसायकल स्वारांना जोराची धडक दिली. मोठा भाऊ दत्ता सुरेश कदम यांचा जागीच मृत्यू झाला. तर लहान भाऊ दिगंबर सुरेश कदम यांचा पाय तुटल्याने तो गंभीर जखमी झाला आहे. दोन्ही भावना निलंगा येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. तर गंभीर जखमीला पुढील उपचारासाठी लातूरला पाठवण्यात आले असून मयतास निलंगा उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन करून प्रेत अंत्यविधी त्यांच्या नातेवाईकांना देण्यात आले.

अपघात बघतानाच मोटारसायलस्वाराचा तोल गेल्याने महिला डोक्यावर पडून गंभीर जखमी या दुर्दैवी अपघातात तिघे जखमी झाले असून अतूल परमेश्वर सूर्यवंशी (वय-३५) रा. रुक्मिणी मारुती सारगे (वय-२३) रा. कासार बालकुंदा हे लई गंभीर जखमी झाले असून त्यांना लातूर येथे हलविण्यात आले आहे. याबाबत पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन घटनेचा पंचनामा करून पुढील कारवाई करण्याची प्रक्रिया सुरु केली आहे.

# आधारकार्ड अद्ययावत करण्यासाठी देगलूरच्या पोस्टात तुफान गर्दी!

## नागरिकांची गैरसोय टाळा अन्यथा उपोषण करणार-धनाजी जोशी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

देगलुर | धनाजी जोशी

जुनी आधारकार्ड अद्ययावत करण्यासाठी, आधार मध्ये दुरुस्ती करण्यासाठी देगलूरच्या पोस्टात तुफान गर्दी होताना दिसत आहे. होत असलेली नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते धनाजी जोशी यांनी वरिष्ठ पातळीवर निवेदन देवून आधार कार्ड साठी होत असलेली नागरिकांची गैरसोय दूर करण्याची मागणी केली आहे.

राज्यात सद्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना आणि प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेसह, विविध आरोग्य योजनेचा लाभ घेण्यासाठी आधारकार्ड आवश्यक आहे. आधार कार्ड अपडेट करण्यासाठी, आधार कार्ड मधील नावाची जन्म तारखेची दुरुस्ती करण्यासाठी एकाच ठिकाणी पोस्ट ऑफिस मध्ये सेवा उपलब्ध आहे. इतर सेतू केंद्रात आर्थिक लूट होत असल्याने नागरिक सहसा जात नाहीत. सेतू केंद्रात अपडेट साठी शंभर ते दोनशे रुपये मोजावे लागतात, यामुळे नागरिकांना मोठी हाल अपेष्ठा सहन करावे लागत आहे. सकाळी ठीक ६.०० वा. पासून देगलूर शहरातील वयोवृद्ध नागरिक, लहान बालके, शाळकरी मुले, मोल मजुरी करणारे रोजंदार, अपंग, अंध व्यक्ती पोस्ट ऑफिसच्या बाहेर रांगेत उभे राहत आहेत. आपले काम धंदा सोडून दिवसभर उन्हा तान्हात पोस्टाच्या प्रांगणात नागरिकांची गर्दी दिसून येते.



इंटरनेटची अडचण साईटचा प्रॉब्लेम विजेची अडचण, इत्यादी कारणे सांगून पोस्ट ऑफिस मधील एकमेव ऑपरेटर कर्मचारी महिला ही सतत टाळाटाळ करीत असते. ठीक एक वाजता आपले नियम अटी सांगत कामकाज बंद करून निघून जातात एका महिलेवर पूर्ण देगलूर तालुक्यातील जनतेचा व्याप असल्याने नागरिकांची मोठी गर्दी होत आहे. शाळेमध्ये हॉस्पिटलमध्ये व विविध ठिकाणी आधार कार्ड सक्तीचे झाल्याने नागरिक आधार कार्ड दुरुस्ती, नवीन आधार कार्ड काढणे, यासाठी देगलूर शहरातील पोस्ट ऑफिस समोर प्रचंड गर्दी होत असल्याचे दिसून येते. या गर्दीतून अनेकदा किरकोळ वादविवाद निर्माण होत आहेत. ही समस्या लक्षात घेऊन मागील काळात देगलूर शहरातील राष्ट्रीयकृत बँकेच्या बाहेर, स्टेट बँक ऑफ इंडिया महाराष्ट्र बँक महाराष्ट्र ग्रामीण बँक इत्यादी ठिकाणी आधार कार्ड दुरुस्ती करण्याची व्यवस्था करण्यात आली होती. परंतु आज घडीला ही व्यवस्था बंद आहे. जास्तीचे ऑपरेटरची नियुक्ती करून नागरिकांची होत असलेली गैरसोय टाळावी अशी मागणी देगलूर शहरातील धडाडीचे सामाजिक कार्यकर्ते धनाजी जोशी यांनी निवेदना द्वारे शासन दरबारीं वरिष्ठ पातळीवर समस्या व्यक्त केली आहे. याकडे दुर्लक्ष झाल्यास अन्यथा विलंब झाल्यास जनहितार्थ देगलूर उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर बेमुदत अमरण उपोषण करण्यात येईल. असेही निवेदनात नमूद आहे.

**मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदें यांची नांदेड जिल्हा पत्रकार गृहनिर्माण संस्था व पारसनगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या विविध प्रश्नासंदर्भात निवेदन देवून काही महत्वाचे विषय त्यांच्यापुढे मांडण्यात आले. त्यांनी हे प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.यावेळी आ.बालाजी कल्याणकर, आ.आनंदराव बोंढारकर व गोवर्धन बियाणी हे उपस्थित होते.(लोकनेता न्युज नेटवर्क मुंबई)**




हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904